# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासनअधिसुचनाक्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४महाराष्ट्रविद्यापीठअधिनियम १९९४ (१९९४ चामहा. ३५)
च्या कलम ३ च्यापोटकलम (२) अन्वयेदिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजीस्थापीतव महाराष्ट्र सार्वजनिकविद्यापीठअधिनियम, २०१६
(सन २०१७ चामहाराष्ट्रविद्यापीठअधिनियमक्रमांक ६) द्वारासंचालितराज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

**फोन/फॅक्सनंबर ०७१३२–२२३१०४** **E-Mail** : registrar.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुलका./3269/२०१८ दिनांक: २७/०४/२०१८

## परिपत्रक

## बृहत विकास आराखडा सन २०१९–२० ते २०२३–२४

सर्व संबधीतांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) पुणे यांचे दिनांक २८ मार्च, २०१८ च्या पत्रामध्ये नमुद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९–२० ते २०२३–२४ या कालावधीसाठी पंचवार्षीक बृहत विकास आराखडे शास्त्रशुध्द पध्दतीने तयार करण्याबाबत कळविलेले होते. त्याअनुषंगाने दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे आयोजीत कार्यशाळेतील चर्चामध्ये दिलेल्या निर्देशानुसार गोंडवाना विद्यापीठाद्वारे सन २०१९–२० ते २०२३–२४ या पाच वर्षासाठी बृहत विकास आराखडा तयार करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने विविध घटकांकडून माहिती संकलित करण्याकरिता सर्वेक्षण प्रश्नावली तयार करण्यात आलेली आहे.

तथापी सर्व संबधीत मा. अधिसभा सदस्य, सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, पालक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, उद्योजक, संस्थाचालक, तसेच विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी खालील प्रमाणे नमुद विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या प्रश्नावलीमध्ये प्रश्नावलीची माहिती ऑनलाईन पध्दतीने दिनांक ०८ मे, २०१८ पर्यंत भरून सादर करावी.

तसेच सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, महाविद्यालय परिसरातील सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, उद्योजक यांना सदर बाबतीत अवगत करून प्रश्नावली भरण्याबाबत प्रोत्साहीत करावे.

- **सर्वेक्षण प्रश्नावली भरण्याची पध्दत**

१ विद्यापीठाचे संकेतस्थळ **unigug.org** मधुन प्रश्नावलीची लिंक ओपन करावे.
२ संकेत स्थळवरील पोर्टलवर लिंक मधील **Perspective Development Plan** वर क्लिक करून प्रवेश करावा. तद्नंतर **बृहत विकास आराखडा सत्र २०१९–२० ते २०२३–२४ सर्वेक्षण प्रश्नावली** वर क्लिक करावे. आपल्याशी संबधीत असलेल्या लिंक वर क्लिक करून माहिती भरावी व सर्वात शेवटी Submit करावे.
३ सदर लिंक उघडण्याकरिता **Google Crome Browser** चा वापर करावा.

डॉ. ईश्वर श्रा. मोहूर्ले
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली